**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ११ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **विधानसभेत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार उत्तर देत नसल्याचा आरोप करत विरोधकांचा सभात्याग.**
2. **'महाराष्ट्र लोकायुक्त सुधारणा विधेयक 2025' विधानसभेमध्ये मंजूर.**
3. **सत्ताधारी पक्ष आणि विरोधकांचे पत्रकार परिषदांद्वारे आरोप प्रत्यारोप.**
4. **राज्यात एकही शेतकरी लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही - कृषी मंत्र्यांची विधानपरिषदेत ग्वाही.**
5. **विदर्भात थंडीचा कडाका कायम: नागपूर, वर्धा आणि गोंदिया जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या थंडीच्या लाटेचा येलो अलर्ट जारी.**

---------------------------------------

विधानसभा

विधानसभेत आज प्रश्नोत्तराच्या तासात नाफेड आणि सीसीआय मार्फत शेतमाल खरेदी संदर्भात सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. या खरेदी केंद्रांद्वारे सोयाबीन आणि कापसाला योग्य भाव मिळत नसल्याकडं सदस्य संतोष दानवे, विजय वडेट्टीवार यांनी सभागृहाचं लक्ष वेधलं. नाफेडच्या माध्यमातून यंदाच्या हंगामामध्ये 19 लाख टन सोयाबीन हमीभावानं खरेदीचं उद्दिष्ट असून हमीभावानं कापसाची खरेदी करण्यासाठी सीसीआयच्या केंद्रांमध्ये वाढ करण्यात येणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत दिली. मात्र रावल यांनी दिलेल्या उत्तरानं समाधान न झाल्यानं विरोधकांनी गदारोळ केला. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यासंदर्भात बैठक घेऊन सरकारला निर्देश देण्याचं आश्वासन दिलं; मात्र तरीही विरोधकांचं समाधान न झाल्यानं विरोधकांनी सभात्याग केला. दरम्यान, महाराष्ट्र लोक आयुक्त सुधारणा विधेयक २०२५ आज विधानसभेत संमत झालं. या विधेयकात तीन छोटे बदल करण्यात आले असून, यामध्ये नवीन भारतीय दंड संहितेचं नाव बदलून, भारतीय न्याय सुरक्षा संहिता असं करण्यात आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या कायद्याअंतर्गत होणाऱ्या नियुक्तीबाबत त्यांनी माहिती दिली -

***(होल्ड बाईट - फडणवीस २९ सेकंद)***

***आपल्याकडे ज्या संस्था केंद्रीय कायद्याच्या माध्यमातून अस्तित्वात आले, उदाहरण द्यायचं झालं तर  रेरा आहे. आता रेरा हा केंद्रीय कायद्यात आलेल्या प्राधिकरण आहे. पण रेरावरची अपॉईंटमेंट ही महाराष्ट्र सरकार करते त्यामुळे एक कन्फ्युजन असं होतं. कि रेरा  हे लोकायुक्त कायद्याच्या अंतर्गत येईल किंवा नाही आणि म्हणून हे कन्फ्युजन आपण दूर करतो आहे आणि केंद्राने केलेल्या कायद्यातल्या एखाद्या प्राधिकरणावर राज्य सरकारने जर अधिकारी अँपॉईंट केला असेल तर तो लोकायुक्ताच्या अत्यारीत येईल.***

राज्यात देवस्थानच्या जमिनीत मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाला असून त्याची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. हैद्राबाद इनामं आणि रोख अनुदानं रद्द सुधारणा विधेयक यावर बोलताना वडेट्टीवार यांनी विधानसभेत ही मागणी केली.

---------------------------------------

उद्धव ठाकरे

मुख्यमंत्री हे मंत्र्यांच्या भ्रष्टाचारावर पांघरूण  घालण्याचं काम करत आहेत. त्यामुळे त्यांनी 'पांघरूण मंत्रालय' तयार करावं, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी आज नागपूर विधान भवनातील त्यांच्या पक्षाच्या विधिमंडळ कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली. मुख्यमंत्री फडणवीस लाडक्या बहिणीचे 2100 रुपये कधी देणार? हा प्रश्न मी अधिवेशनात विचारणार आहे, असंही ठाकरे यांनी सांगितलं. यंदा राज्यात अतिवृष्टीनं शेतकरी चिंतातूर असून नुकतंच केंद्रीय कृषिमंत्र्यांनी महाराष्ट्राकडून मदतीसाठी कुठलाही प्रस्ताव आला नाही, असं सांगितल्यामुळे राज्य सरकारचं बिंग फुटलं असल्याची प्रतिक्रिया ठाकरे यांनी दिली.

***(होल्ड बाईट - ठाकरे - ३२ सेकंद)***

***मुख्यमंत्र्यांनी एक भलं मोठा पॅकेज असे गोंडस शब्द देऊन एक रक्कम घोषित केली. त्या पॅकेजचं पुढे काय झालं हे कळायला काही मार्ग नाही आहे गेल्या महिन्याच्या अखेरीस देशाचे कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं की महाराष्ट्रकडून आपत्ती ग्रस्तांच्या मदतीसाठी कोणताही प्रस्ताव अद्याप आलेला नाही आणि हे राज्य सरकारचं बिंग त्यांनी फोडल्यानंतर घाईघाईने शेवटच्या आठवड्यात एक प्रस्ताव केंद्राकडे पाठवला असं जाहीर करण्यात आलं आम्हाला आता जाणून घ्यायचे आहे कि, हा नेमका प्रस्ताव काय गेलेला किती रकमेचा गेलेला आहे, त्यातून कोणाला मदत होणार आहे.***

याशिवाय मदतीच्या नावावर काही शेतकऱ्यांच्या खात्यात विमा रक्कम म्हणून एक रुपये, सहा रुपये जमा झाले असल्यानं या कंपन्यांवर कारवाई होणार का? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. उपमुख्यमंत्री पद हे असंविधानिक असूनही ते या सरकारनं टिकवलं आहे. मात्र विरोधी पक्षनेता हे पद संविधानिक असूनही त्यावर निर्णय झाला नाही, अशी टीका ठाकरे यांनी केली.

---------------------------------------

एकनाथ शिंदे पत्रकार परिषद

शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या 32 हजार कोटींपैकी प्रशासकीय विभागांमार्फत 14 हजार कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नागपूरच्या अधिवेशनादरम्यान त्यांच्या विधिमंडळ पक्ष कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना त्यांनी सांगितलं की ज्यांनी मुंबई लुटली, कोविडमध्ये भ्रष्टाचार केला, अशा लोकांना गृहमंत्री अमित शहांवर बोलण्याचा तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पांघरूण मंत्रालय स्थापन करा म्हणण्याचा अधिकार नाही. उपमुख्यमंत्री पदाबाबत केलेल्या टीकेला उत्तर देताना शिंदे यांनी सांगितलं की विधानसभेत लोकांनी कोणाचा कितवा नंबर आहे, हे दाखवून दिलं आहे. लाडक्या बहिणींचे 2100 रुपये हे योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन देण्यात येतील, असंही शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केलं.

---------------------------------------

नाना पटोले

मुंबई महापालिकेचे सहाय्यक आयुक्त महेश पाटील यांना एक महिन्याच्या सक्तीच्या रजेवर पाठवण्याच्या निर्णयावर काँग्रेस नेते नाना पटोले यांनी टीका करत अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना बडतर्फ केलं पाहिजे असं सांगितलं. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील विधिमंडळाचा दर्जा विद्यमान सरकारनं घालवला असल्याची टीका पटोले यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना केली.

***(होल्ड बाईट - नाना पटोले - १३ सेकंद)***

***विधीमंडळाचं कामकाज जे आहे त्याचं स्वारस्य या सरकारला नाही. सगळे आपल्या सेटिंगमध्ये लागले राहतात आणि त्यामुळे जी विधीमंडळाचं जो दर्जा होता महाराष्ट्राचा या सरकारने घालवलेला असे म्हटले तर वावगं ठरणार नाही.***

---------------------------------------

राज्यमंत्री पंकज भोयर

वर्धा जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी अमली पदार्थांच्या तस्करीचं रॅकेट उघडकीला आलं. त्यासंदर्भात चौकशी सुरू असल्याचं गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानभवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. वर्धा जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी एक मेफेड्रॉनचा कारखाना उघडकीला आणून महसूल गुप्तवार्ता संचालनालयानं १९२ कोटी रुपये किमतीचे १२८ किलो अमली पदार्थ जप्त केले होते. संबंधित कारखान्याला सील लावलं असून याप्रकरणी आपण स्थानिक पोलिसांच्या संपर्कात असल्याचं भोयर म्हणाले.

---------------------------------------

विधानपरिषद

शेतकऱ्यांना शेततळी, अवजार खरेदी आणि इतर गरजांच्या मदतीसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही आणि एकही शेतकरी लाभार्थी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज विधानपरिषदेत दिली. गेल्या ४ वर्षांपासून विविध प्रकारच्या मदतीसाठी शेतकऱ्यांनी केलेले सुमारे ४८ लाख अर्ज कारवाईविना पडून असल्याबाबत रणजीतसिंग मोहिते पाटील, संजय खोडके, शशिकांत शिंदे आणि इतरांनी विचारलेल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते. कृषी समृद्धी योजनेसाठी दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय सरकारनं घेतला असल्याची माहिती त्यांनी दिली. ऐकूया आजच्या विधानपरिषद कामकाजाचा वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून -

***(व्हॉइस कास्ट - नम्रता)***

***नागपूरसह विदर्भातील वाढत्या वाळू तुटवड्याचा मुद्दा तीव्र झाला असून शिवसेना नेते कृपाल तुमाने यांनी वाळू उपलब्ध नसल्यानं काम ठप्प झाल्याची तक्रार मांडली. नागपूरमध्ये वाळूचे दर 9 ते 12 हजारांपर्यंत पोहोचल्यानं आणि 223 घाटांपैकी अनेकांचे लिलाव बाकी असल्यानं परिस्थिती गंभीर असल्याची तक्रार केली. राज्यमंत्री योगेश कदम यांनी नवीन वाळू धोरणानुसार प्रत्येक गटातील 10% वाळू घरकुलांसाठी राखीव ठेवली असून 31 डिसेंबरपर्यंत सर्व लिलाव पूर्ण होणार असल्याचं सांगितलं. शिवसेनेचे हेमंत पाटील यांनी वाळू माफियांच्या दबदब्याचा आरोप करत वितरण प्रक्रिया ऑनलाइन करण्याची मागणी केली. त्यावर घरकुल बांधकाम सुरू असलेल्या गावांत थेट तहसीलदारांमार्फत वाळू उपलब्ध करून देण्याची व्यवस्था असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. विधान परिषदेत बुलढाण्यातील बंजारा समाजावरील कथित अन्यायाचा मुद्दा आज पुन्हा गाजला. 50 जणांनी खोट्या जातप्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी-शिक्षणातील आरक्षणाचा लाभ घेतल्याचा गंभीर***

*आरोप करत काँग्रेसचे राजेश राठोड यांनी संबंधित अधिकारी लाचखोरी करत असल्याचं सांगितलं. मंत्री संजय शिरसाट यांनी बार्टीच्या चौकशीनुसार बुलढाणा जातपडताळणी समितीने योग्यरीत्या काम न केल्याचं सांगत उपायुक्त आणि सचिवांवर पुढील चौकशी सुरू असल्याची माहिती दिली. काँग्रेसचे सतेज पाटील यांनी प्रमाणपत्रे रद्द करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. विधान परिषदेत लक्षवेधीच्या तासात जिल्हा परिषद शाळांसंबंधित विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अरुण लाड यांनी राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता, महिला शिक्षकांची अनुपलब्धता आणि प्रशासकीय त्रुटींबाबत शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले. त्याला उत्तर देताना शिक्षकांची भरती पवित्र पोर्टलच्या माध्यमातून केली जाते आणि त्याची अंमलबजावणी जिल्हा परिषद सीईटो मार्फत होते. मुलींची संख्या जास्त असल्यास त्या शाळेत महिला शिक्षक नेमण्याची सध्या कोणतीही विशेष तरतूद नाही; मात्र या बाबत विचार केला जाईल, असं उत्तर शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिलं. याबाबत भाजपचे चित्रा वाघ, आणि काँग्रेसचे जयंत आसगावकर यांनी उपप्रश्न विचारले. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)*

---------------------------------------

मातंग समाज मोर्चा

अनुसूचित जाती उपवर्गीकरण तात्काळ लागू करण्यासह इतर मागण्यांसाठी उद्या मातंग समाजाद्वारे मोर्चा काढण्यात येणार आहे. लहुजी शक्ती सेनेच्या विष्णू कसबे यांच्या नेतृत्वात मुंबई ते नागपूर पदयात्रेला दोन नोव्हेंबरला सुरुवात झाली असून ही सातवी पदयात्रा उद्या नागपुरात दाखल होईल.

---------------------------------------

क्रिकेट

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दुसरा टी-ट्वेंटी क्रिकेट सामना आज चंदीगड इथं होणार आहे. सायंकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. पाच सामन्यांच्या मालिकेत पहिला सामना जिंकून भारतानं एक - शून्य अशी आघाडी घेतली आहे.

---------------------------------------

हवामान

विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात थंडीचा कडाका कायम असून गोंदिया इथं आज आठ अंश सेल्सिअस, तर नागपूर इथं आठ पूर्णांक एक दशांश अंश सेल्सिअस इतक्या

किमान तापमानाची नोंद झाली. वर्धा इथं नऊ पूर्णांक नऊ, तर गडचिरोली आणि यवतमाळ इथं दहा अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आलं. नागपूर, वर्धा, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या थंडीच्या लाटेचा येलो अलर्ट हवामान विभागातर्फे देण्यात आला आहे. आगामी काही दिवस वातावरणात फारसा बदल होणार नसल्याचा अंदाज देखील हवामान विभागानं व्यक्त केला आहे. दरम्यान थंडीपासून बचाव करण्यासाठी स्थानिकांनी उपाययोजना कराव्यात, असं आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे.

---------------------------------------